**शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग, त्यांच्या अखत्यारितील महामंडळ,मंडळ, प्राधिकरणे यांच्या मालकीच्या जमिनी व्यावसायिक प्रयोजनास्तव भाडेपट्ट्याने देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:- जमीन-२०२५/प्र.क्र.१३७/जमीन-०१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ८ एप्रिल, २०२६.

**<u>वाचा</u>** :- १.महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २९,३८
२.महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम,१९७१ चे नियम ३५
३. शासन निर्णय क्र. जमीन-०३/२०१३/प्र.क्र.१५५/ज-१, दि. ०१.०८.२०१९
४. शासन निर्णय क्र. जमीन २५०५/प्र.क्र.४०५/ज-२ दि. १२.१२.२०१२.
५. मा.मंत्रिमंडळाचे दि.२७.०१.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णय.

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३८ मध्ये शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्याबाबत तरतूद आहे. तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३५ मध्ये भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या बाबतीतील भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्याबाबत तरतूद आहे.

**०२.** शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ अन्वये उर्वरित महाराष्ट्रामधील (बृहन्मुंबई, माथेरान, महाबळेश्वर, रायगड जिल्ह्यातील "ड" सत्ताप्रकाराचे भाडेपट्टे, भाडेपट्ट्याने दिलेल्या शेतजमिनी व औद्योगिक वसाहतीसाठी दिलेले भाडेपट्टे आणि विदर्भातील नझूल जमिनी वगळून) शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या व यापुढे संपणाऱ्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे धोरण विहित करण्यात आले आहे. तसेच, बृहन्मुंबईतील (मुंबई शहर व उपनगर जिल्हा) शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे सुधारित धोरण शासन निर्णय दि. १२.१२.२०१२ व शासन शुध्दीपत्रक दि. १७.०१.२०१३ अन्वये निश्चित करण्यात आले आहे.

**०३.** मा. मंत्रिमंडळाच्या मंगळवार,दि.२७.०१.२०२६ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत " महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदीन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देणेबाबतचा कालावधी वाढवून देणेबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने **शासनाच्या विविध**

प्रशासकीय विभागाच्या मालकीच्या अथवा महसूल विभागाने विशिष्ट प्रयोजनासाठी त्या विभागाकडे हस्तांतरित केलेल्या तसेच, त्यांच्या अखत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या मालकीच्या अथवा हस्तांतरित केलेल्या शासकीय जमिनींच्या बाबतीत सर्व संबंधित प्रशासकीय विभाग व महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांना सर्वंकष मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

मा. मंत्रिमंडळाच्या मंगळवार, दि.२७.०१.२०२६ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत, शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग, त्यांच्या अखत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या मालकीच्या जमिनी भाडेपट्ट्याने देण्याबाबत खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

*"शासनाच्या विविध प्रशासकीय विभागाच्या मालकीच्या अथवा महसूल विभागाने विशिष्ट प्रयोजनासाठी त्या विभागाकडे हस्तांतरित केलेल्या तसेच त्यांच्या अखत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या मालकीच्या अथवा हस्तांतरित केलेल्या शासकीय जमिनी,महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या उत्पन्न वाढीसाठी* ***विविध व्यावसायिक प्रयोजनास्तव*** *विविध संस्थांना आवश्यकतेनुसार प्रथमत: जास्तीत जास्त ४९ वर्षांपर्यंत व तद्नंतर कोणत्याही अटी व शर्तीचा उल्लंघन झालेला नसल्यास, संबंधित विभागाला आवश्यकतेनुसार सदर भाडेपट्ट्याचे पुन्हा एकवेळ जास्तीत जास्त ४९ वर्षांच्या मर्यादेत नुतनीकरण करुन, योग्य तो भाडेपट्टा आकारुन भाडेपट्ट्याने देता येतील."*

*तसेच,"४९ वर्षासाठी शासकीय जमिनी भाडेपट्टयाने देताना सध्या भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनींचे संभाव्य नुतनीकरण, भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनींच्या भुईभाड्यामध्ये ठराविक निश्चित मुदतीत वाढ तसेच भुईभाड्याची रक्कम भाडेपट्टाधारकाकडून नियमितपणे शासन जमा करण्यात येईल, त्यावर योग्यप्रकारे संनियंत्रण संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांकडून ठेवण्यात यावे."*

**०२.** मा.मंत्रिमंडळाच्या मंगळवार दि.२७.०१.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत उक्त प्रमाणे नमूद केलेले निर्देश सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या निदर्शनास आणून देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

**०३.** सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांना यापूर्वी भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनींच्या भाडेपट्ट्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झालेला आहे किंवा कसे याबाबत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या यंत्रणेमार्फत स्थानिक चौकशी करुन शर्तभंग झालेला असल्यास सदर शर्तभंग नियमानुकूल केल्यानंतरच या धोरणातील तरतूदीनुसार भाडेपट्ट्याने देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**०४.** सदर धोरण महसूल विभागाने रहिवास, वाणिज्यिक अथवा इतर प्रयोजनासाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीकरिता लागू नाही. महसूल विभागाला यापूर्वीचे शासन निर्णय दि.१२.१२.२०१२ व दि.०१.०८.२०१९ नुसार निश्चित करण्यात आलेले भाडेपट्ट्याचे धोरण लागू राहील.

**०५.** सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या अ.नौ.सं.क्र.५२६/२०२५/व्यय-९,दि.२४.०९.२०२५ अन्वये प्राप्त सहमतीने व मा.मंत्रिमंडळाच्या दि.२७.०१.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**०६.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०४०८१४४६०६२९१९ असा आहे, हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MOHASIN RAJMAHMAD SHAIKH

Digitally signed by MOHASIN RAJMAHMAD SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=613D5F4E81161C3485310241B06DD6CE7372AD8BAF95F5AE576D53AC61AFE62B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=74CDE6704F3FD0A42314F2424B55F3CFA18AE8A657DC2FC61B51901A90B029D5, cn=MOHASIN RAJMAHMAD SHAIKH
Date: 2026.04.08 14:47:24 +05'30'

**(मोहसिन रा. शेख)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री(क्रिडा व राज्य उत्पादन शुल्क)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५) मा.मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
६) मा.राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व प्रशासकीय विभाग,मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव,(महसूल) महसूल व वन विभाग याचे विशेष कार्य अधिकारी.
१०) जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमी अभिलेख,पुणे.
११) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१२) महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई.
१३) सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी.
१४) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५) सर्व "ज " समूह कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१६) निवड नस्ती (कार्यासन जमीन-०१)